**साक्षीदार क्र. ४**

**मी याव्दारे प्रतिज्ञेपुर्वक निवेदन करतो की,**

**नाव : मंजाबापु मारुती तांबे,**

**वय : ५१ वर्ष, धंदा: शेती,**

**रा. दाड बुद्रुक, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर**

**साक्षीदाराचा सरतपास सरकारी विधिज्ञ श्री. आर. के. शिंदे यांचेमार्फत सुरू :**

पोलिसांनी मला पंचनाम्यासाठी बोलविले होते. मी रस्त्याने जाताना सोनई-घोडेगाव रोवर अपघात झाला होता. त्यावेळी पोलिसांनी मला बोलवुन घेतले होते. सदरचा पंचनामा सोनई-घोडेगाव पुलाजवळ अपघात झालेल्या ठिकाणी झाला. सदरचे अपघात ग्रस्त ठिकाण सोनई-घोडेगाव रोडवर ग्रामपंचायतीच्या विहीरीजवळ होते. आता मला सदरील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी अ.क्र. १ वर सही आहे. सबब, घटनास्थळ पंचनाम्यास **निशाणी २४** देण्यात येते. पोलिसांनी अपघातग्रस्त गाडी बाजुला नेवुन पेट्रोलपंपाजवळ गाडीचा पंचनामा केला. त्या गाडीचे पुर्ण केबिन व बॉक्स तुटलेले होते व चेसी बेंड झालेली होती. तसेच त्यातील स्पेरपार्टस, स्टेअरींग असेम्ब्ली तुटलेली होती. त्या गाडीचा क्रमांक एम.एच. १७ बी. डी. ६१८३ असा होता. आता मला गाडीच्या दिसते परिस्थीतीचा पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. सबब, सदरील गाडीच्या पंचनाम्यास **निशाणी २५** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण,**

**उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञ ॲड. श्री. ए. टी. आगळे यांचे मार्फत सुरु-**

पंचनाम्यासाठी मला पोलिसांनी बोलविले त्यावेळी मी रस्त्याने जात होतो. पोलिसांनी मला साधारणपणे संध्याकाळी ४.४५ ते ५ च्या दरम्यान बोलविले. पोलिसांनी मला पंचनाम्यासाठी दि. २८/०६/२०२४ रोजी सकाळी साडेदहा ते बाराच्या दरम्यान घोडेगाव पेट्रोलपंपाजवळ बोलविले. त्या पेट्रोलपंपावर मी साधारणत दोन ते तीन तास थांबलो. त्यानंतर मी माझ्या कामाला निघुन गेलो. त्याठिकाणी माझ्या कोणी ओळखीचे नव्हते. मी सोमनाथ गोपिनाथ शिंदे याला ओळखतो कारण तो संगमनेर येथील आहे. मी साधारणत संध्याकाळच्या ४.३० च्या दरम्यान घरी गेलो. मला घटनास्थळाच्या चर्तुसिमा सांगता येणार नाहीत. आम्ही पेट्रोलपंपावर सह्या

केल्या. मी दोन्ही पंचनाम्यावर पेट्रोलपंपावर सह्या केल्या. हे मला आठवत नाही की, मी दोन्ही पंचनामे वाचुन पाहिले. साक्षीदार स्वतहुन सांगतो की, पोलिसांनी फक्त सह्या घेतल्या. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी २४ व २५ वरील पंचनामे माझ्या समक्ष झाले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण,फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

PRANITA RITESH SUGAONKAR

Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2026.01.27 05:44:55 +0530

दिनांक :- २७/०१/२०२६

(डॉ. पी. आर. सुगांवकर)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, नेवासा.